# शिक्षण विभाग (प्राथमिक)

## प्राथमिक शिक्षण

प्राथमिक शिक्षण हे व्यक्तिमत्व विकासाचे , समाज परिवर्तनाचे आणि राष्ट्रीय विकासाचे एक प्रमुखआणि प्रभावी साधन आहे ही बाब विचारात घेवून कोल्हापूर जिल्हा परिषदेने केंद्गशासनाच्या व राज्यशासनाच्या विविध शैक्षणिक योजनाबरोबरच जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतूनसुद्धा विविध शैक्षणिक योजना राबविलेल्या आहेत. बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 अन्वये 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकाचा शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे . शिक्षणापासून वंचित असणा-या बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेता यावे , शिक्षणाच्या संख्यात्मक विकासाबरोबरच दर्जामध्ये सुधारणा व्हावी या उद्देशाने प्राथमिक शिक्षण विभाग कार्यरत असून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणासाठी प्रयत्नशील आहे . या विभागाचे कामकाम समग्र शिक्षा व आस्थापना विभागामार्फत केले जाते.

शालेय सांख्यिकी माहिती

- जिल्हा परिषदेच्या एकूण प्राथमिक शाळांची संख्या-1958
- जिल्हा परिषदेच्या प्राथमिक (1ली ते 5वी ) शाळांची संख्या-1106
- जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक (1ली ते 8वी) शाळांची संख्या-866
- जिल्हा परिषदेच्या एकूण माध्यमिक शाळांची संख्या— 04
- जिल्हापरिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी संख्या-1,44,324
- जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक संख्या-8091

## प्राथमिक शिक्षण विभाग - आस्थापना

| अ. क्र. | संवर्ग | मंजूर पदे | कार्यरत पदे | पैकी इतर कार्यालया कडे कार्यरत | आस्थापनेवर कार्यरत |
|---|---|---|---|---|---|
| १ | उपशिक्षणाधिकारी | २ | ० | ० | ० |
| २ | अधिक्षक (सा.रा.से.) | १ | १ | ० | १ |
| ३ | कक्ष अधिकारी | १ | १ | ० | १ |
| ४ | अधिक्षक | ३ | ३ | ० | ३ |
| ५ | विस्तार अधिकारी श्रेणी -२ | ५ | ५ | ० | ५ |
| ६ | वरिष्ठ सहाय्यक | १९ | १५ | ६ | ९ |
| ७ | कनिष्ठ सहाय्यक | २३ | २१ | २ | १९ |
| ८ | कनि. लेखाधिकारी | २ | २ | ० | २ |
| ९ | व. सहा. लेखाधिकारी | २ | १ | ० | १ |
| १० | क. सहा. लेखाधिकारी | १ | १ | ० | १ |
| ११ | परिचर | २२ | १५ | ५ | १० |

### जिल्हा परिषद स्वनिधी योजना -

- **अध्यक्ष चषक विद्यार्थी क्रीडा स्पर्धा**

  **योजनेचा उद्देश**- विदयार्थ्यांच्या क्रिडा गुणाना वाव देणे

  **योजनेचे लाभार्थी पात्रता निकष व लाभार्थी निवड पध्दती** - जिल्हा परिषद,शाळेतील इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंतचे सर्व विदयार्थी. केंद्रस्तर ,तालुकास्तर व जिल्हा स्तर या तीन स्तरावर स्पर्धा घेऊन प्रत्येक स्तरावरील विजेत्याना बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

- **विद्यार्थी सांस्कृतिक स्पर्धा**

  मंजूर तरतुद :- रु.2,00,000/- जि.प.स्वनिधी

  **योजनेची संक्षिप्त माहिती –**

  जि.प.व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळांतील विदयार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणेसाठी विदयार्थी सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले जाते . तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांकांच्या स्पर्धक / गटांना जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभागी करून घेतले जाते.

सदरच्या स्पर्धा या कनिष्ट गट (इ.1 ली ते 5 वी ) व वरिष्ठ गट (इ.6 वी ते 8 वी) या गटामध्ये व खाली स्पर्धाप्रकारानुसार घेतल्या जातात.

- समुहगीत
- समुहनृत्य
- नाटयीकरण
- कथाकथन
- प्रश्नमंजुषा

**योजनांचे निकष व अटी**-

1. कनिष्ठ गटामध्ये सहभागी होणेसाठी विदयार्थी हा जि.प.व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळेत इ.1 ली ते 5 वी या वर्गात शिकत असणारा असावा.
2. वरिष्ठ गटामध्ये सहभागी होणेसाठी विदयार्थी हा जि.प.व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळेत इ.6 वी ते 8 वी या वर्गात शिकत असणारा असावा.

➢ **जिल्हा प्रज्ञा शोध परीक्षा**

परीक्षा परिषद पुणे यांचेमार्फत इयत्ता ५ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत कोल्हापूर जिल्हा कायम राज्यात अग्रस्थानी राहीला आहे . ही परंपरा कायम राखण्यासाठी व या परीक्षांची पूर्व तयारी म्हणून प्रज्ञाशोध परीक्षा घेतली जाते.

१. कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत जि.प. स्वनिधीमधून इयत्ता ४ थी व ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सदरची नाविन्यपूर्ण योजना राबविली जाते.

२. तालुकास्तरावर प्रतितालुका गुणवत्ता प्राप्त प्रथम ३ विद्यार्थ्यांना रोख रक्कम रु.१५००/-, रु.१०००/- व रु. ५००/- व चषक व प्रमाणपत्र दिले जाते.

३. जिल्हास्तरावर गुणवत्ता प्राप्त प्रथम ३ विद्यार्थ्यांना रोख रक्कम रु.५०००/-, रु.४०००/-, रु. ३०००/- व उत्तेजनार्थ ७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.२०००/- व चषक, प्रमाणपत्र दिले जाते.

➢ **योजनेचे नांव** :- २२०२-१०१-५० उत्कृष्ट काम करणा-या प्राथमिक,माध्यमिक शाळेतील शिक्षकांनाप्रोत्साहन पारितोषिके शिक्षक दिन), आदर्श शिक्षक पुरस्कार

मंजुर तरतुद :- जिल्हा परिषद स्वनिधीमधुन रक्कम रुपये १०००००/-

योजनेची प्रस्तावना :-

जिल्हा शिक्षक पुरस्कारासाठी अंदाजीत आराखडा कोल्हापूर जिल्हयातील प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांना त्यांच्या उत्कृष्ठ कामा बाबत गौरव करणेत येतो. त्यासाठी गट शिक्षण अधिकारी पंचायत

समिती यांनी विहित नमुन्यातील निकषानुसार संबधित शिक्षकांकडून प्रस्ताव मागणी करुन घेतो. प्राप्त प्रस्तावातील अध्यापक,मुख्याध्यापक यांचे शाळेस भेट देवुन प्रस्तावातील कामाची समक्ष पाहणी करुन मा.सभापती मा.गट विकास अधिकारी यांचे संमतीने प्रस्ताव सादर करणेत येतो.

शासन निर्णय महाराष्ट्र शासन परिपत्र क संकीर्ण/१०००/प्र.क्र/३२४१/१५ दि १२/१२/२००० नुसार प्रत्येक तालुक्यातुन जिल्हा परिषद शाळा अंतर्गत एक प्राथमिक व एक माध्यमिक शिक्षक तसेच जिल्हयातुन एक विशेष पुरस्कार (कला ,संगीत,क्रिडज्ञ,अपंग ) यापैकी एकाची निवड करणे बाबत सुचना आहेत महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र संकीर्ण/२०३/प्र क्र ४४८/आस्था-९ दि २२ डिसेंबर २००३ चे पत्रानुसार खाजगी माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे प्रस्ताव स्वीकारु नये असे स्पष्ट सुचना आहेत.

कार्यालयाकडे येणा-या प्रस्तावास मा सभापती,गट विकास अधिकारी,गट शिक्षणाधिकारी या समितीच्या शिफारशी नुसारच कमीत कमी ३ प्रस्ताव सादर केले जातात.समिती मार्फत आलेल्या सर्व प्रस्तावाची छाननी करुन प्राधान्य् क्रम ठरविला जातो.प्रस्तावित शाळांची पाहणी जिल्हास्तरीय समिती करते.प्राप्त शाळेच्या प्रस्तावावर निकषानुसार गुणदान केले जाते व त्यामध्ये सर्वाधिक गुण प्राप्त होणा-या प्रस्तावाची निवड केली जाते.सदर प्रस्तावास मा आयुक्त पुण विभाग पुणे यांची मान्यता घेणेत येते.

योजनेचे उद्दिष्ट :- शिक्षकांना प्रोत्साहन मिळणेसाठी दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो.

## ➢ निवासी क्रीडा प्रशाला शिंगणापूर(चंबुखडी) ता-करवीर, जिल्हा कोल्हापूर

१) **ग्रामीण भागातील बालवयातील गुणवान खेळाडूंना प्रशिक्षीत करणे.**
२) **त्यांच्या कौटुंबिक अडचणीमुळे त्यांना खेळापासून परावृत्त व्हावे लागू नये यासाठी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे एक आश्वस्त संस्था म्हणून उभे राहणे अशा सामाजिक बांधीलकीतून राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशालेच्या निर्मीती करण्यात आली आहे.**
३) **अशा प्रकारे जिल्हा परिषदेने राबविण्यात आलेल्या उपक्रमामध्ये देशातील पहिली निवासी क्रीडा प्रशाला कोल्हापूर येथे आहे**
४) **प्रशिक्षण केंद्राची स्थापना :- जून २०१४**
५) **विद्यानिकेतनची शाळेच्या इमारतीसह मोकळी साडेनऊ एकर जागेत निवासी इमारत व मोकळी जागा आहे. त्यामध्ये मुला मुलींचे सुसज्ज वस्तीगृह, ४०० मिटर रनिंग ट्रॅकसह विविध खेळांची क्रीडांगणे विकसीत केली आहेत.**
६) **निवासी क्रीडा प्रशालेकडील विद्यार्थ्यांना मोफत निवास, अल्पोपहार आणि भोजन तसेच इतर त्याअनुषंगीक बाबींच्या खर्चासाठी रु. १५.०० कोटी इतकी ठेव ठेवली असून त्यावरील जमा होणारे व्याजातून सर्व खर्च केला जातो**
७) **निवासी क्रीडा प्रशालेकडे स्थापनेपासून कुस्ती, खो-खो, कबडडी आणि मैदानी खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. सन २०२२ पासून रग्बी खेळ सुरु करण्यात आलेला आहे.**

# राजर्षि छत्रपती शाहू निवासी क्रीडा प्रशालेकडील उल्लेखनीय कामगिरी

| सन | राज्यस्तर | | राष्ट्रीयस्तर | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली | |
| २०१४ | १० | ७ | ३ | १ | २१ |
| २०१५ | १७ | १४ | १० | ९ | ५० |
| २०१६ | २४ | २० | १४ | ९ | ६७ |
| २०१७ | ३२ | २५ | २० | १५ | ९२ |
| २०१८ | ३५ | २० | ५ | ६ | ६६ |
| २०१९ | २४ | २२ | १० | ८ | ६४ |
| २०२२ | १ | ५ | ० | ० | ६ |
| एकूण | १४३ | ११३ | ६२ | ४८ | ३६६ |

## आंतरराष्ट्रीय स्तर कुस्ती

| | मुले | मुली | |
|---|---|---|---|
| | १ | २ | |

**शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम**

- **पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक (इ. ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा - फेब्रुवारी २०२३.**
  १) कोल्हापूर जिल्हा शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात प्रथम.

  २) राज्य गुणवत्ता यादीत ग्रामीण विभागात इयत्ता ५ वी चे ३९ तर इयत्ता ८ वी चे २३ विद्यार्थी गुणवत्ताधारक.

  ३) राज्य गुणवत्ता यादीत शहरी विभागात इयत्ता ५ वी चे ३३ तर इयत्ता ८ वी चे ०९ विद्यार्थी असे एकूण १०४ विद्यार्थी गुणवत्ताधारक.

  ४) ग्रामीण व शहरी क्षेत्रात पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५ वी) परिक्षेत एकूण ५९१ शिष्यवृत्तीधारक

  **५)** ग्रामीण व शहरी क्षेत्रात पूर्व माध्यमिक (इ. ८ वी)) परिक्षेत एकूण ५६९ शिष्यवृत्तीधारक

## ➢ डिजीटल शाळा :-

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या एकूण 1958 प्राथमिक शाळा आहेत . या शाळा मार्फत ग्रामीण भागातील मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची सुयोग्य व्यवस्था आहे . शाळेमध्ये मोफत व दर्जेदार प्राथमिक शिक्षणासाठी कोल्हापूर जिल्हा परिषद नेहमी आग्रही राहिलेली आहे . शिक्षण प्रक्रियेमध्ये नाविन्याचा ध्यास व सकारात्मक बदल करण्यास प्राधान्य दिले जाते . डिजिटल शाळा हा नाविन्यपुर्ण उपक्रम कोल्हापूर जिल्ह्यात सुरु आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या 1269 शाळांमध्ये संगणक उपलब्ध असून 1952 शाळांमध्ये ई -लर्निंग सुविधा उपलब्ध आहे . 1844 शाळांमध्ये L.C.D. प्रोजेक्टर व 238 शाळेमध्ये विद्यार्थ्यांना टॅब उपलब्ध करुन देणेत आलेले आहेत.

## ➢ स्मार्ट टू ग्लोबल क्लासरुम :-

जिल्हा वार्षिक योजनामधील नाविन्यपूर्ण योजनेतून सन २०२२-२३ मध्ये वि .मं. यादववाडी, ता.करवीर या शाळेस रक्कम रु . ३८.६४ लाख निधी प्राप्त होता . त्यामधून विद्या मंदिर यादववाडी , ता.करवीर या जिल्हा परिषद शाळेत अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित Smart To Global Classroom हा महाराष्ट्रातील पहिला प्रकल्प पूर्ण केलेला आहे . यामध्ये इंटरॲक्टिव स्मार्ट बोर्ड , प्रोजेक्टर, संगणक, कराओके सिस्टिम, बोलक्या भिंती, फॅन, एल.ई.डी ट्युब अशा भौतिक सुविधाने वर्ग परिपूर्ण आहे.

## ➢ व्हर्च्युअल क्लासरूम (पथदर्शी उपक्रम) (Futuristic Classroom)

कोरोना महामारीच्या काळात शाळा बंद होत्या. तथापि ऑनलाईन शाळा व्हर्च्युअल क्लासरूम या नाविन्यपूर्ण संकल्पनेद्वारे विद्यार्थ्याचे शिक्षण सुरु ठेवणेत आले . दिप फौडेशनच्या वतीने कागल येथे निर्माण केलेल्या लेक्चर कॅप्चर स्टूडीओमध्ये अत्याधुनिक तांत्रीक साधनांच्या मदतीने Actual Teaching Lesson (ATL) निर्मिती केली जाते. यामध्ये ८० तज्ञ विषय शिक्षक मार्गदर्शन करत आहेत.

सद्या विद्या मंदिर बानगे , ता. कागल या शाळेमध्ये हा पथदर्शी उपक्रम सुरू आहे . या उपक्रमांतर्गत शिक्षकांचे अध्यापन इतर सर्व शाळांनाही LIVE पाहता येते.

## ➢ माझा वर्ग - माझी ओळख

भुदरगड तालुक्याने माझा वर्ग -माझी ओळख हा नाविन्यपुर्ण उपक्रम राबवून राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे . समाज मन जागृत करणेचे महत्वपूर्ण कार्य या उपक्रमाच्या माध्यमातून होत आहे . शिक्षकांना दरवर्षी वर्गशिक्षक म्हणून वेगवेगळी वर्ग खोली न देता एकच खोली देणेत आली . त्यामूळे

स्वत:च्या व समाजाच्या आर्थिक सहभागातून, श्रमदानातून नाविन्यपूर्ण अनेक बदल घडवून आणण्यात आला आहे.

या उपक्रमासाठी रक्कम रु. २१,३२,८७७/- शिक्षक स्वनिधी व रक्कम रु.२६,०९,८५१/- पालक लोकसहभाग व सामाजिक संस्थेकडून रक्कम रु . ६,४७,८५०/- असा एकूण सुमारे रक्कम रु . ५४,००,०००/- निधी जमा झाला होता . यातून वर्गशिक्षकांनी ४०० वर्गाचे व शाळेचे अंतर्बाहय रुपडे बदलण्याचे काम केले आहे.

**शाळासिद्धी उपक्रम**

- सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करून घेणे व शाळांची गुणवत्ता आश्वासित करणे अत्यंत महत्त्वाचे असून शैक्षणिक, भौतिक तसेच संस्थात्मक गुणवत्ता वाढीच्या उद्देशाने राज्य शासनाने राष्ट्रीय पातळीवरील शाळासिद्धी हा कार्यक्रम सुरू केलेला आहे. त्यानुसार दरवर्षी राज्यातील १००% शाळांचे स्वयंमूल्यमापन निपा,नवी दिल्ली यांच्या शाळासिद्धी वेबपोर्टलवर करणे आवश्यक आहे.
- शाळासिद्धी स्वयंमूल्यमापनामध्ये खालील सात क्षेत्रांद्वारे शाळांची श्रेणी निश्चित केली जाते. या श्रेणीद्वारे शाळांचा दर्जा ठरवला जातो.
    - शाळेचे सामर्थ्य स्त्रोत
    - अध्यापन, अध्ययन आणि मूल्यांकन
    - विद्यार्थ्यांची प्रगती, संपादणूक आणि विकास
    - शिक्षकांची कामगिरी आणि व्यवसाय विकासाची व्यवस्थापना
    - शालेय नेतृत्व आणि व्यवस्थापन
    - समावेशन, आरोग्य आणि संरक्षण
    - उत्पादक समाजाचा सहभाग
- शाळासिद्धी पोर्टलला कोल्हापूर जिल्ह्यातील सन २०२१-२२ चे शाळासिद्धी स्वयंमूल्यमापन १०० % पूर्ण झाले आहे. तसेच सन २०२२-२३ चे शाळासिद्धी स्वयंमूल्यमापन सुरु झाले आहे.
- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर मार्फत मार्च २०२३ मध्ये सन २०२०-२१ या वर्षातील ३३० शाळांचे बाह्यमूल्यमापन करण्यात आले.

- **जिल्हा नियोजन समिती उपक्रम**

- **सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२०२२ ते २०२२-२०२३ :-**

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राथमिक शाळांना इमारत बांधकामासाठी अनुदान या योजनेअंतर्गत सन २०२१-२०२२ व सन २०२२-२३ या वर्षाकरीता एकुण र.रु.२४ कोटी ४९ लक्ष अनुदान मंजूर असुन त्यामधुन २७२ नवीन वर्ग खोल्या कामे मंजूर करणेत आलेली आहेत. त्यापैकी १२१ वर्गखोली बांधकामे पूर्ण करुन घेतली आहेत.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राथमिक शाळांची दुरूस्ती करणे या योजनेअंतर्गत सन २०२१-२०२२ व सन २०२२-२३ या वर्षाकरीता एकुण र .रु.२६ कोटी १९ लक्ष अनुदान मंजूर असुन त्यामधुन ५८१ प्राथमिक शाळांची दुरूस्ती करणे कामे मंजूर करणेत आलेली आहेत . त्यापैकी ३२७ शाळा दुरुस्ती बांधकामे पूर्ण करुन घेतली आहेत.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ४ जि.प.संचलीत शासकीय माध्यमिक शाळांची दुरूस्ती/बांधकाम करणे या योजनेअंतर्गत सन २०२१-२०२२ व सन २०२२-२३ या वर्षाकरीता एकुण र.रु.१ कोटी ५६ लक्ष अनुदान मंजूर असुन त्यामधुन एकुण १८ कामे मंजूर करणेत आलेली आहेत. त्यापैकी १० शाळा दुरुस्ती बांधकामे पूर्ण करुन घेतली आहेत.

- **इयत्ता ६ वी ते ८ वी मधील विद्यार्थ्यासाठी ग्रंथालय पुस्तके**
- **रोबोटीक्स किट पुरविणे**
- **कनेक्टींग रुरल महाराष्ट्र**

**शासकीय योजना**

- मुलींची पटसंख्या वाढविणेसाठी प्रा.शि. उत्तेजनार्थ पारितोषिक.
- प्राथ. शाळातून पुस्तक पेढ्या उघडणे.
- दुर्बल घटकातील मुलींना शाळेत नियमित येणेसाठी मुलींना उपस्थिती भत्ता.
- १०३ विकास गटातील
- 
- इ. १ ली, ४ थी च्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविणे.
- शैक्षणिक दृष्ट्या मागास भागातील प्रा.शि. मधील अनु.जाती/ अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती.
- १०३ विकास गटासाठी इ. १ ली, ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे.
- माजी शासकीय माध्यमिक शाळा इमाती बांधकामासाठी जि.प. ना अनुदान.
- अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरविणे.
- अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता देणे.
- शैक्षणिक दृष्ट्या मागास भागातील प्रा.शा. मधील अनु.जाती/अनु.जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती.
- १०३ विकास गटासाठी इ. १ ली, ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे.
- दुर्बल घटकातील मुलींना शाळेत नियमित येणेसाठी मुलींना उपस्थिती भत्ता.
- ४ टक्के सादिलवार मधून जि.प.च्या प्राथमिक शाळांना कार्यालयीन खर्चासाठी अनुदान पुरविणे.

## **समग्र शिक्षा कार्यक्रमाची अंमजबजावणी**

1) **गटसाधन केंद्र अनुदान** -

समग्र शिक्षा अंतर्गत कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेसाठी प्रत्येक तालुक्यावर एक गटसाधन केंद्राची स्थापना करणेत आलेली आहे. गटशिक्षणाधिकारी हे सदर गटसाधन केंद्राचे प्रमुख आहेत. या उपक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये 12 गटसाधन केंद्र आहेत. गटस्तरावर कार्यरत असलेले समग्र शिक्षा अंतर्गत कर्मचारी यांच्या वेतनाची तरतूद या उपक्रमातून केली जाते. तसेच गटसाधन केंद्राच्या कार्यालयीन खर्चासाठी सादिल व सभा प्रवास याकरिता निधी उपलब्ध होतो.

2) **समुहसाधन केंद्र अनुदान** -

सदर उपक्रमांतर्गत प्रत्येक केंद्राच्या ठिकाणी समुहसाधन केंद्राची निर्मिती करणेत आलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात जिल्हा परिषद अंतर्गत 171 केंद्रे आहेत. या उपक्रमांतर्गत केंद्राचा सादिल व सभा प्रवासाकरिता निधी उपलब्ध होतो.

3) **समावेशित शिक्षण (प्राथमिक)** -

जिल्ह्यातील 0 ते 18 वयोगटातील दिव्यांग बालकांच्या विशेष शिक्षणाकरिता व सोई-सुविधाकरिता सदर उपक्रमातून कार्यवाही केली जाते. यामध्ये विशेष शिक्षकांच्या माध्यमातून विशेष शिक्षणाची सोय, शिक्षकांना मार्गदर्शन करणेत येते. मोजमाप शिबीर घेवून विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या साधन सामुग्री पुरविणेत येते. (व्हील चेअर, ट्रायसायकल, श्रवणयंत्र, कुबड्या, सीपीचेअर इ.) तसेच कार्यरत फिजिओथेरपीस्टमार्फत थेरेपीची आवश्यकता असणाऱ्या मुलांना थेरेपी सेवा पुरविली जाते. शाळेत दिव्यांग मुलांची उपस्थिती वाढावी यासाठी तीव्र स्वरुपातील दिव्यांग विद्यार्थ्यांना मदतनीस भत्ता, ज्या गावामध्ये पुढील शिक्षणाची व्यवस्था नसलेस पुढील शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना येणे-जाणेसाठी प्रवास भत्ता दिला जातो. पुर्णतः अंध असणाऱ्या विद्यार्थ्यांना वाचक भत्ता तसेच दिव्यांग मुलींची शाळेत उपस्थिती वाढावी यासाठी प्रोत्साहन भत्ता यांची तरतूद केली जाते.

4) **संयुक्त शाळा अनुदान (प्राथमिक)** -

इयत्ता 8 वी चा सर्वात वरचा वर्ग असणाऱ्या सर्व शासकीय प्राथमिक शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना (जिल्हा परिषद , नगरपालिका, नगरपरिषद इ .) संयुक्त शाळा अनुदान 01 ते 30 असणाऱ्या शाळांना प्रतिशाळा रु . 5,000/-, 31 ते 100 असणाऱ्या शाळांना प्रतिशाळा रु . 12,500/-, विद्यार्थी पटसंख्या 101 ते 250 असणाऱ्या शाळांना प्रतिशाळा रु. 25,000/-, विद्यार्थी पटसंख्या 251 ते 1000 असणाऱ्या शाळांना प्रतिशाळा रु . 37,500/- तसेच 1000 पेक्षा जास्त पटसंख्या असणाऱ्या शाळांना रु . 50,000/- या प्रमाणे एकूण 2046 शाळांकरीता अनुदान उपलब्ध करुन देणेत येते. यामधून शाळांना आवश्यक असणारी दुरुस्ती व सादिल इ. खर्च करणेत येतो.

5) **संयुक्त शाळा अनुदान (माध्यमिक)** -

सर्वात वरचा वर्ग इयत्ता 10 किंवा 12 वी पर्यंतचे वर्ग असणाऱ्या एकूण 10 शासकीय माध्यमिक शाळांना संयुक्त शाळा अनुदान उपलब्ध करुन देणेत येते. यामधून शाळांना आवश्यक असणारी दुरुस्ती व सादिल इ. खर्च करणेत येतो.

6) **मोफत गणवेश वितरण**-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील 115848 विद्यार्थ्यांसाठी मोफत दोन गणवेश व एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे याकरिता र.रु. 1386.37 लाख निधी उपलब्ध करुन दिला आहे. यापैकी गटांकडे र.रु.694.49 लाख निधी गटांना वर्ग केला आहे.

7) **विद्यार्थी वाहतूक सुविधा** -

बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमाच्या अनुषंगाने इ.१ ली ते ५ वी करिता १ कि.मी.तर इ. ६ वी ते ८ वी करिता ३ कि.मी.पेक्षा कमी अंतरामध्ये शाळा उपलब्ध नसणा-या विद्यार्थ्यांना शासकीय,स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत नियमित ये-जा करणेकरिता प्रतिविद्यार्थी प्रतिमहा रु.६००/-प्रमाणे १० महिन्यांकरिता रु.६०००/-इतका वाहतूक सुविधा निधी मंजूर केला जातो.सदरचा निधी जिल्हास्तरावरून PFMS प्रणालीद्वारे थेट पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात वर्ग केला जातो.

समग्र शिक्षा वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०२३-२४ नुसार जिल्ह्यातील एकूण ९०३ विद्यार्थी वाहतूक सुविधा निधीकरिता पात्र असून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडून निधी व मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेनंतर निधी वितरीत करणेत येईल.

- **शाळाबाह्य मुलांना विशेष प्रशिक्षण –**

कधीही शाळेत दाखल न झालेल्या किंवा ३० दिवसापेक्षा जास्त सतत गैरहजर असणा-या विदयार्थ्यांना RTE ॲक्टनुसार शाळाबाह्य समजणेत येते.अशा शाळाबाह्य बालकांना नियमित शाळेत वयानुरुप समकक्ष वर्गात दाखल करुन त्यांचा मागे राहिलेला अभ्यास भरुन काढणेसाठी नियमित शिक्षकांमार्फत विशेष प्रशिक्षणाद्वारे उपचारात्मक अध्यापन केले जाते.

समग्र शिक्षा वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०२३-२४ करिता ६९ शाळाबाह्य विद्यार्थी आढळले असून त्यांना या शैक्षणिक वर्षात वयानुरुप वर्गातील विशेष प्रशिक्षण देणेची कार्यवाही करणेत येत आहे.

8) **बांधकाम**-

सदर उपक्रमामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विशेष दुरुस्ती, मुला-मुलींचे स्वच्छतागृह, नवीन वर्गखोल्या इ. करिता निधी उपलब्ध होतो. सदरची सर्व बांधकामे शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करणेत येतात.

10) **कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय** (KGBV) -

कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यामध्ये मुलींच्यासाठी निवासी वसतीगृह कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरु करणेत आलेले आहे. या विद्यालयात अनाथ, विधवा, परितक्त्या , एकच पालक असलेल्या, दारिद्रय रेषेखालील पालकांच्या इ. मुलींना इयत्ता 6 वी ते 12 वीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलींना प्रवेश देणेत येतो. यामध्ये मुलींना निर्वाह भत्ता, विद्या वेतन, आरोग्य तपासणी याकरिता खर्च करणेत येतो.

11) **PM SHRI School :-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील विविध तरतुदींची अंमलबजावणी करावयाची असून त्या माध्यमातून उत्कृष्ट पायाभूत भौतिक सुविधा , योग्य संसाधने , आनंददायी व उत्साहवर्धक शैक्षणिकदृष्ट्या अनुकूल वातावरण , उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणा -या, सर्वसमावेशक, विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण देणा -या यामध्ये देशामधील - 14500 शाळा विकसीत करावयाच्या असून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद - 15, महानगरपालिका - 02 व नगरपलिका - 01 शाळा अशा एकूण - 18 शाळा विकसीत करावयाच्या असून निवड झालेली आहे . तसेच सन 2023-24 साठी जिल्ह्यातील 188 शाळांनी सहभाग नोंदविला आहे.